वर्ष-०९ | अंक-२१ | मुंबई, मंगळवार ११ ते १७ एप्रिल - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

PG|2

# पोलीस बातमी पत्र

# POLICE BATMI PATRA

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

सुपर फूड:शरीराच्या प्रत्येक अवयवासाठी अन्न, ते परिपूर्ण बनवण्यात ठरते सहायक

3 → आय.जे.आर : न्यायव्यवस्थेत कोणत्या राज्याची कशी अवस्था ?

मुंबई महापालिका रूग्णालयांमध्ये मास्क अनिवार्य ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## लैंगिक अत्याचारामुळे तरुणीची आत्महत्या



ठाणे: डायघर भागात नातेवाईकांच्या घरी शिक्षणासाठी आलेल्या एका १७ वर्षीय मुलीवर तिच्या चुलत आत्याच्या दिराने लैंगिक अत्याचार केल्याने तिने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला ...पान २ वर...

# ठाकुर्लीत मोबाईल चोरी करणारा अटकेत



ठाकुर्लीतील एका व्यापाऱ्याचा मोबाईल दुकानाच्या मंचकावरुन चोरुन पसार होणाऱ्या चोरट्याला रामनगर पोलिसांनी अटक केली आहे. चोरटा उत्तर प्रदेशातील रहिवासी आहे.विवेककुमार श्यामबिहारी श्रीवास्तव (२२) असे चोरट्याचे नाव आहे. तो उत्तर प्रदेशातील मंजरपूर तालुक्यातील फिरस्ता गावचा रहिवासी आहे. ...पान २ वर...

# एटीएम मशीनमधून पैसे काढून देण्याच्या बहाण्यानं एटीएम कार्डची अदलाबदल

वसई: एटीएम कार्डची हेराफेरी करुन फसवणाऱ्या आरोपींना विरार पोलिसांनी बेड्या ठोकल्यात. पैसे काढण्यासाठी आलेल्या व्यक्तीला बोलण्यात गुंतवून त्याच्या अकाऊंटमधले 63 हजार रुपये आरोपींनी काढले. नालासोपारा पूर्वेकडील धानीवबाग तलावाजवळच्या एटीएममध्ये ही घटना घडली. सीसीटीव्हीच्या आधारे तपास करुन पोलिसांनी साहिल शेख




आणि सागर मंडल या दोन आरोपींना अटक केली आहे. या दोघांकडून दीड लाखांची रोख रक्कम पोलिसांनी जप्त केली आहे. 22 मार्चला पावणे आठच्या दरम्यान फिर्यादी रोहित राय हा नालासोपारा पूर्वेकडील धानीवबाग

## दोघांना अटक आरोपींकडून दीड लाख रुपये जप्त

तलावाजवळील ए.टी.एम. सेंटर मधून पैसे काढण्यासाठी गेला होता. त्यावेळी दोघा ...पान २ वर...

# ऑन ड्युटी पोलीस अधिकारी मद्यधुंद अवस्थेत तर्रर्र, उभं राहणं झालं अवघड; वरिष्ठांनी दिले गुन्हा दाखल करण्याचे आदेश

हिंगोली पोलीस (Hingoli Police) दलात खळबळ उडवून देणारी बातमी समोर आली आहे. कारण एका सहायक पोलीस निरीक्षक चक्क ड्युटीवर मद्यधुंद अवस्थेत आढळून आला आहे. रात्रीच्या गस्तीवर निघालेला हा पोलीस अधिकारी एवढी दारू प्यायला होता की, त्याला नीट उभं राहणं अवघड झाले होते. दरम्यान गस्तीवर असताना एका पोलीस ठाण्यात नोंद करण्यासाठी गेलेल्या या पोलीस अधिकाऱ्याची अवस्था पाहून त्या पोलीस ठाण्यातील कर्म चाऱ्यांना धक्काच बसला. त्यामुळे अखेर याची माहिती वरिष्ठांना देऊन या पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील गिरी असे या अधिकाऱ्याचे नाव असून, तो हिंगोली शहर पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनील गिरी हे हिंगोली शहर पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत आहे. तर 9 एप्रिलला त्यांची नाईट ड्युटी लागली होती. त्यामुळे ते जिल्हा रात्री गस्तीवर होते. दरम्यान गस्तीवर असताना गिरी हे रात्री 1.55 वाजता रात्रगस्त चेकिंगसाठी औंढा पोलीस ठाण्यात पोहचले. मात्र पोलीस ठाण्यात जाताच त्यांची अवस्था पाहून ठाण्यातील पोलिसांना धक्काच बसला. कारण गिरीला व्यवस्थितपणे चालता येत नव्हते. तो बोबड्या भाषेत बोलत होते. तसेच उग्र वास येत असल्याने त्यांनी प्रचंड मद्यपान केल्याचे उपस्थित पोलीस कर्म चारीआणि अधिकाऱ्यांच्या लक्षात आहे. वरिष्ठांनी दिले गुन्हा दाखल करण्याचे आदेश रात्रगस्त चेकिंगसाठी औंढा पोलीस ठाण्यात आलेल्या सुनील गिरी याने अधिकची दारू प्यायलाचे लक्षात येताच, औंढा पोलीस ...पान २ वर...

# आधी शाब्दिक चकमक, त्यानंतर दोन्ही गट भिडले; छत्रपती संभाजीनगरमध्ये दोन गटांत तुंबळ हाणामारी

छत्रपती संभाजीनगरच्यापैठण तालुक्यातील थेरगाव येथे क्षुल्लक कारणावरून दोन गटांत थेट लाठ्या-काठ्या व दगडाने झालेल्या तुंबळ हाणामारीत आठ जण जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. शुक्रवारी सायंकाळी सहावाजेच्या सुमारास ही घटना घडली असून, ज्यात आठ जण जखमी झाले आहेत. दरम्यान या प्रकरणी पाचोड पोलीस ठाण्यात पंधरा जणांविरुद्ध शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पैठण तालुक्यातील थेरगाव येथील शेख याकूब कडूभाई व शेख नजीर अब्दुल यांची आजूबाजूला शेती आहे. तर दोघांना शेतात ये जा करण्यासाठी गाडी रस्ता आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वी गावातील शेख इस्माईल यांनी या जमिनीच्या नाल्यात मुरूम टाकला होता. त्यामुळे शेख नजीर व त्याचे कुटुंबीय शेख याकूब यांच्याकडे गेले आणि मुरूम उचलून घेण्याचं सांगितले. मात्र आम्ही तो मुरूम टाकला नसून, ज्यांनी टाकला आहे त्यांना उचलून घेण्याचो सांगतो असे शेख याकूब यांनी शेख नजीर यांना म्हटले. ...पान २ वर...

# डोंबिवलीत दूध डेअरीमधून रेल्वे तिकिटांचा काळाबाजार



डोंबिवली येथील पूर्व रेल्वे स्थानक भागातील एका दूध डेअरीत रेल्वे तिकिटांचा काळाबाजार करुन तिकिटांची प्रवाशांना चढ्या दराने विक्री केली जात होती. रेल्वे गुन्हे शाखेचे पथक आणि रेल्वे दलाच्या जवानांनी रविवारी या डेअरीत छापा मारुन तेथून एक लाख ६८ हजार रुपयांची ९४ तिकिटे जप्त केली. काळाबाजार करणाऱ्या इसमाला अटक ...पान २ वर...

# इन्स्टाग्रामवर लायटर पिस्तुल घेऊन व्हिडीओ बनवणे पडलं महागात; पोलिसांनी ठोकल्या बेड्या

सध्या सोशल मीडियावर रील्स बनवण्याची मोठी क्रेझ तरुणांमध्ये पाहायला मिळत आहे. त्यातली त्यात ॲक्शन व्हिडीओवर अधिक भर दिला जातो. त्यामुळे चित्रपटामधील डायलॉगवर हातात शस्त्र घेऊन व्हिडीओ बनवणाऱ्यांची संख्या अधिक आहे. पण छत्रपती संभाजीनगरमधील एकाला इन्स्टाग्रामवर (Instagram) लायटर पिस्तुल घेऊन व्हिडीओ बनवणे पडलं महागात पडले आहे. कारण पोलिसांनी त्याला बेड्या ठोकत त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली आहे. करण बाबासाहेब पगारे (वय 19 वर्षे) असे या तरुणाचे नाव आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ व्हायरल होत होता. ज्यात एक तरुण हातात बंदूकसारखे शस्त्र घेऊन दहशत निर्मा ण करण्याचा प्रयत्न करत होता. याबाबत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शिवूर पोलीस ठाण्याचे प्रमुख संदीप पाटील यांना याबाबत माहिती मिळाली. त्यामुळे त्यांनी याबाबत तात्काळ पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांना माहिती दिली. तर संबधित तरुणावर कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक ...पान २ वर...

## सावधान! बुलढाणा शहर महिलांसाठी असुरक्षित! बारा तासांत सोनसाखळी चोरीच्या दोन घटना




बुलढाणा : जिल्हा आणि पोलीस विभागाचे मुख्यालय असलेले बुलढाणा शहर आता महिलांसाठी सुरक्षित राहिले नाही, असेच चित्र आहे. गेल्या बारा तासांतच 'चेन स्नॅचिंग' अर्था तसोनसाखळी चोरीच्या दोन घटना घडल्यामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आज, सोमवारी सकाळी राम मंदिरातून दर्शन घेऊन घरी परत जात असलेल्या एका महिलेला ...पान २ वर...

## आधी शरीरसंबंध ठेवले अन् एक हजार रुपयांची मागणी करताच रिक्षा चालकाने तिला संपवलं!




नवी मुंबईतील महापे-शिळफाटा येथील अडवली भुतवली गावालगतच्या जंगलामध्ये महिलेचा मृतदेह 22 मार्च रोजी आढळला होता. नवी मुंबई पोलिसांना या हत्येचा उलगडा करण्यास यश मिळाले आहे. एक हजार रुपयांची मागणी केल्याने ही हत्या करण्यात आली असल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी एका रिक्षा चालकाला अटक केली आहे. 22 मार्च रोजी घडलेल्या महिलेच्या हत्या प्रकरणात ...पान २ वर...



# साप्ताहिक राशी भविष्य

### मेष — फाजील विश्वास नको

प्रबळ ग्रहांची नाराजी असल्याने कटू अनुभव येतील, धीराने सामोरे जा. कार्यापासून विचलित न होता प्रयत्नशील राहा व पुढे सरका. व्यवहारात सावधपणा ठेवा. फाजील विश्वास न ठेवता काळ-वेळ पाहून कृती करण्याचे धोरण अवलंबा. कलाक्षेत्राला वाव मिळेल. प्रवास कराल. वरिष्ठांशी जुळवून घ्या. प्रकृतीची पथ्ये पाळा.
**शुभ दिनांक** १४, १५.

### वृषभ — कामाची वाहवा होईल

महत्त्वाच्या कामात अडथळे निर्माण होऊ शकतात, वादाचे प्रसंग, चिडचिडपणा. परंतु अशा प्रसंगांना सावधपणे व संयमाने सामोरे जाणेच योग्य. सहकाऱ्यांची उत्तम साथ लाभल्याने आपल्या कामाची वाहवा होण्याची शक्यता राहील. कलाक्षेत्रात चमकण्याची संधी मिळेल. प्रवास कराल. साहस टाळा व प्रवासात सतर्क राहा.
**शुभ दिनांक** ९, १०, ११.

### मिथुन — कामाला वेग द्या

जी महत्त्वाची कामे आहेत त्याला सुरुवातीला वेग द्या. व्यापार-उद्योगात वसुलीला महत्त्व द्या. त्यामध्ये जरी मागे-पुढे झाले तरी गिऱ्हाईकांना नाराज करू नका. नवीन आणि चांगला प्रकल्प तुमच्या मनात घोळत राहील. नोकरीमध्ये वरिष्ठ पूर्वी ठरविलेले एखादे काम हातात घेण्यासाठी आग्रह धरतील. घरामध्ये सर्वकाही छान असेल.
**शुभ दिनांक** ९, १०, ११, १२, १३.

### कर्क — आवडत्या कामात लक्ष घाला

महत्त्वाची कामे अर्धवट राहिली असतील तर त्याचा पाठपुरावा कराल. पैशाची आवक समाधानकारक असेल. नोकरीच्या ठिकाणी जी कामे पूर्वी काही कारणाने लांबवावी लागली होती ती हातावेगळी कराल. नवीन नोकरीच्या कामाला ताबडतोब वेग द्या. घरामध्ये जे काम तुम्हाला मनापासून आवडते त्यामध्ये लक्ष घालाल.
**शुभ दिनांक** १२, १३, १४, १५.

### सिंह — मानसिकता चांगली ठेवा

मानसिक स्थिती विचलित होऊ न देता मिळणाऱ्या संधीचा योग्य उपयोग करून पुढे चला. ज्येष्ठांची अनुकूलता लाभणार असल्याने त्याचा फायदा घ्या. बौद्धिक क्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळून मानसिकता अधिक चांगली ठेवता येईल. प्रतिकूल ग्रहांच्या प्रतिकूलतेचे स्वास्थ्यावर पडसाद पडणार नाहीत याची दक्षता घ्या.
**शुभ दिनांक** १४, १५.

### कन्या — कसोटीचे प्रसंग

अनेक कसोटीच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागेल. कामकाजात विलंब, छोट्या गोष्टींपासून होणारे गैरसमज, आत्मविश्वासाची कमतरता या गोष्टींचा अनुभव येणार आहे. वादाचे प्रसंग निर्माण झाल्याने मानसिक स्थिती अस्थिर होण्याची शक्यता. सामंजस्याने व संयमाने परिस्थिती हाताळण्याचे तंत्र अवलंबा व प्रयत्नशील राहा.
**शुभ दिनांक** ९, १०, ११.

### तूळ — आत्मविश्वासाची कमतरता

कसोटीच्या प्रसंगाना तोंड द्यावे लागेल. कामात विलंब, छोट्या गोष्टींपासून होणारे गैरसमज, आत्मविश्वासाची कमतरता याचा अनुभव येणार आहे. कौटुंबिक वादाचे प्रसंग निर्माण झाल्याने मानसिक स्थिती अस्थिर होण्याची शक्यता आहे. सामंजस्याने व संयमाने परिस्थिती हाताळण्याचे तंत्र अवलंबा व प्रयत्नशील राहा.
**शुभ दिनांक** १२, १३.

### वृश्चिक — इतरांवर छाप टाकाल

नवीन उलाढाल आणि फायद्याचे प्रमाण वाढविण्यास भर राहील. नोकरीच्या ठिकाणी एखाद्या मीटिंगमध्ये तुमच्या बोलण्यामुळे तुम्ही इतरांवर छाप टाकाल. बेकार व्यक्तींना नोकरी मिळेल. घरामध्ये काही तरी नावीन्यपूर्ण कल्पना तुमच्या मनात येईल. प्रवासाचे बेत अर्धवट राहिलेले असतील तर ते पूर्ण करता येतील.
**शुभ दिनांक** ९, १०, ११, १४, १५.

### धनु — कुचंबणा होईल

कुचंबणा होत असेल, हातातोंडाशी आलेला घास उगाचच लांब जातो असे वाटेल. ज्यांना मदत केली ते वेळेला येतीलच याची शाश्वती नसेल तरीही आत्मविश्वास वाढता राहणार आहे. ग्रहमान अनुकूलतेकडेच झुकणारे आहे. तब्येत हा एकमेव भाग लक्ष देण्यासारखा आहे. आरोग्यसल्ला न ओलांडता, कामात गुंतवून घ्या.
**शुभ दिनांक** १२, १३.

### मकर — परतफेड करा

उत्साहाला उधाण आणणारे ग्रहमान आहे. मनात आलेली इच्छा पूर्ण झाल्याशिवाय चैन पडणार नाही. कर्ज घेतले असेल तर त्याची परतफेड करा. जोडधंदा असणाऱ्यांचा खिसा गरम राहील. नवीन नोकरीकरिता प्रयत्न करणाऱ्यांना मुलाखतीत यश मिळेल. चालू असलेल्या कामात संस्थेचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल.
**शुभ दिनांक** ९, १०, ११, १४, १५.

### कुंभ — गोड बोलून कामे करा

तुमच्या हौशी आणि महत्त्वाकांक्षी स्वभावाला खतपाणी घालणारे ग्रहमान आहे. जे काम तुम्ही हातात घ्याल, त्यातून फायदा झालाच पाहिजे असा तुमचा आग्रह असेल. एखादे तातडीचे काम नियंत्रणात आणण्यासाठी छोटा प्रवास कराल. घरात गोष्टी तुमच्या मनाप्रमाणे घडवून आणण्याकरिता इतरांशी गोड बोलून कामे करून घ्या.
**शुभ दिनांक** ९, १०, ११, १२, १३.

### मीन — सफलता मिळेल

एका कष्टदायक पर्वाची सांगता झाल्यामुळे तुमच्या मनावरचा ताण कमी होईल. व्यापार-उद्योगात खर्च वाढल्यामुळे थोडासा तणाव आला असेल तर काळजी करण्याचे कारण नाही. कोणत्या तरी वेगळ्या मार्गाने पैसा मिळाल्याने तुमचे मन शांत होईल. नोकरीच्या ठिकाणी सप्ताहाच्या सुरुवातीला एखादे बेचव काम करावे लागेल. नवीन नोकरीच्या शोधात सफलता मिळेल.
**शुभ दिनांक** १२, १३, १४, १५.

# सुपर फूड:शरीराच्या प्रत्येक अवयवासाठी अन्न, ते परिपूर्ण बनवण्यात ठरते सहायक

काही अन्नपदार्थ वेगवेगळ्या अवयवांसाठी महत्त्वाचे असतात, म्हणून त्यांना म्हणतात सुपर फूड, ते कार्यप्रणाली सुधारतात शरीराच्या प्रत्येक अवयवाचे वेगळे महत्त्व आहे आणि म्हणूनच त्याचे आरोग्य महत्त्वाचे. निसर्गात प्रत्येक अवयवासाठी विशेष अन्न आहे, जे त्याच्या गरजा पूर्ण करतात. या सुपर फूडचा आहारात समावेश करा. ते तुम्हाला आरोग्याच्या शिखरावर नेऊ शकते-

**हृदय**
सफरचंद आणि बेरी रक्तवाहिन्या स्वच्छ करण्यास सर्वा धिक सक्षम डॅश आहार हृदयासाठी सर्वोत्तम आहे. त्यात भाज्या, फळे आणि कडधान्य यांचे संतुलन असते. सफरचंद आणि बेरीदेखील लाभदायक आहेत. त्यात अँटिऑक्सिडंट असतात. सफरचंदाच्या सालीमध्ये शक्तिशाली फायबर असते, ते हृदयातून रक्त पंप करणाऱ्या धमन्या स्वच्छ करते. त्यामुळे हृदय निरोगी राहते.

**डोळे**
ब्रोकोलीतून मिळते ल्युटिन, ते नैसर्गिक दृष्टीचे उत्तम संरक्षक
ल्युटिन एक शक्तिशाली कॅरोटिनॉइड आहे, जे नैसर्गिक दृष्टी संरक्षक म्हणून ओळखले जाते. ते डोळ्यांना नुकसान करणारा निळा प्रकाश फिल्टर करते, आणि डोळ्यातील पडद्याचे नुकसान टाळते. पालक, ब्रोकोली आणि स्प्राउट्समध्ये हे भरपूर प्रमाणात असते. या भाज्या ५० ते ६० ग्रॅम रोजच्या आहारात खाव्यात.

**मेंदू**
जवस, सोयाबीन, राजमा यामध्ये ओमेगा ३ असल्याने मेंदू होतो तल्लख
निरोगी आणि तल्लख मेंदूसाठी तुमच्या आहारात चिया सीड्स, फ्लेक्ससीड्स, सोयाबीन, राजमा, सॅल्मन, ट्यूना, सार्डिन फिश इत्यादींचा समावेश करा. वास्तविक त्यामध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स आढळतात. मेंदूचा ६० टक्के भाग फॅटचा असतो.



यातही सुमारे ३० टक्के फॅट ओमेगा ३ ने बनलेले असते.

**त्वचा**
गाजर, टोमॅटो, भोपळा त्वचेतील बॅक्टेरिया बाहेर टाकतात
व्हिटॅमिन ए हे आपल्या त्वचेला निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक असलेले अँटिऑक्सिडेंट आहे. हे त्वचेचे पीएच संतुलित करते. त्वचेतून बॅक्टेरिया काढून टाकते. पिवळ्या आणि हिरव्या भाज्यांमध्ये व्हिटॅमिन ए भरपूर प्रमाणात असते. गाजर, भोपळा, टोमॅटो, पपई यांचा आहारात समावेश करणे आवश्यक आहे.

**लिव्हर**
कांदे, लसूण सुधारतात यकृताची **कार्यक्षमता**
हे शरीराचे मास्टर फिल्टर आहे, त्याचे काम रक्त स्वच्छ करणे, शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकणे हे आहे. कांदे, लसूण इत्यादी सल्फर असलेले पदार्थ यकृताची कार्यक्षमता सुधारतात. याशिवाय लिंबू, संत्री यांसारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये आढळणारे सायट्रिक ॲसिड त्याची फिल्टरिंग क्षमता वाढवते.

**किडनी**
पालेभाज्या शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकतात
किडनीचे काम रक्तातील विषारी पदार्थ काढून टाकणे आहे. किडनीसाठी स्वच्छ पाणी ही सर्वा त महत्त्वाची गोष्ट आहे. हिरव्या पालेभाज्यांमध्ये आढळणारी जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबरमुळे त्याचे काम सोपे होते. सफरचंदात आढळणारे पेक्टिन नावाचे फायबर यासाठी खूप फायदेशीर आहे.

**रक्त**
खजूर, बीटरूट स्नायूंच्या ऊतींपर्यंत रक्त प्रवाह वाढवते
गूळ, हरभरा, शेवगा हे लोहाचे उत्तम स्रोत आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोहाच्या शोषणासाठी व्हिटॅमिन-सी खूप महत्त्वाचे आहे. दुसरीकडे बीटरूटचा आहारात समावेश केला तर ते रक्तासाठी सुपर फूडसारखे आहे. त्यात मोठ्या प्रमाणात नायट्रेट असते, त्यामुळे स्नायूंच्या ऊतींमध्ये रक्तप्रवाह वाढतो.

**स्नायू**
सोयाबीन लाभदायक, उच्च प्रथिनयुक्त आहार घ्या
पन्नाशीनंतर स्नायूंच्या वस्तुमानात दरवर्षी १ ते २% घट होते. यासाठी बीन्स खूप लाभदायक आहेत. यामध्ये फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे व वनस्पती-आधारित प्रथिने आणि कमी चरबी असते. ट्यूना आणि सॅल्मन मासे लाभदायक आहेत. त्यात ओमेगा ३ फॅटी ॲसिड असते, ते पॉली अनसॅच्युरेटेड फॅट असते.

**हाडे**
दूध आणि पालेभाज्या हे कॅल्शियमचे चांगले स्रोत
दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये कॅल्शियम असते, त्यामुळे हाडे मजबूत होतात. यासोबतच ब्रोकोली, कोबी, भेंडी, नाचणी इत्यादी पालेभाज्यांचा आहारात नक्कीच समावेश करा. कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन केदेखील त्यात आढळतात. अंडीही लाभदायक असतात.

## इन्स्टाग्रामवर लायटर पिस्तुल घेऊन व्हिडीओ

कलवानिया यांनी दिले. पोलीस अधीक्षक यांनी दिलेल्या सुचनेनुसार संदीप पाटील यांनी तरुणाचा शोध घेण्यासाठी तात्काळ एका पथकाची नियुक्ती केली. ज्यात नागटिळक, विशाल पैठणकर, तायडे मेजर या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश होता. दरम्यान या पथकाने तरुणाचा सर्वत्र शोध मिळालेल्या माहितीनुसार अखेर त्याला ताब्यात घेतले. तसेच संबधित व्हिडीओ आणि बंदूकसारखे दिसणाऱ्या शस्त्राबाबत विचारपूस केली असता त्याने ते लायटर पिस्तुल असल्याची माहिती दिली. तर त्याच्या ताब्यातून अशा दोन लायटर पिस्तुल पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत. तसेच त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती शिवूर पोलीस ठाण्याचे प्रमुख संदीप पाटील यांनी दिली आहे. तसेच कोणीही सोशल मीडियावर दहशत निर्मा ण करण्याचा प्रयत्न करत असेल किंवा चिथावणी देणारे व्हिडीओ तयार करुन व्हायरल करत असेल तर त्याची गय केली जाणार नाही असा इशारा संदीप पाटील यांनी दिला आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात नामांतराच्या मुद्यावरुन सुरु असलेला वाद आणि गेल्या आठवड्यात दोन गटात झालेल्या वादानंतर पोलिसांकडून सोशल मीडियावर विशेष लक्ष दिले जात आहे. सध्या शहर आणि ग्रामीण पोलिसांचे सायबर पथक सोशल मीडियावर केल्या जाणाऱ्या प्रत्येक पोस्ट आणि घडामोडीवर लक्ष ठेवून आहेत. तसेच कोणत्याही व्यक्तीने सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यास तात्काळ त्याच्यावर कारवाई केली जात आहे. त्यामुळे सोशल मीडियावर पोस्ट करताना काळजी घेतली पाहिजे अन्यथा तुम्हाला देखील कायदेशीर कारवाईचा सामना करावा लागू शकतो.

## ठाकुर्लीत मोबाईल

ठाकुर्ली चोळेगावातील रहिवासी पदमाकर पांडुरंग चौधरी (४८) यांचे चोळेगावात बिअर शा ॅपीचे दुकान आहे. शनिवारी रात्री अकरा वाजता त्यांच्या दुकानात एक जण बिअर खरेदीसाठी आला. त्याने पदमाकर यांच्याकडे बिअरची मागणी केली. पदमाकर दुकानाच्या आतील भागात बिअर बाटली आणण्यासाठी गेले. त्यावेळी चोरट्याने त्यांचा दुकानाच्या मंचकावर ठेवलेला ७० हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरुन तेथून पसार झाला. पदमाकर ग्राहकाला बिअर बाटली देण्यासाठी समोर आले तर ग्राहक तेथे नव्हता. त्यांना त्यांचा मोबाईल गायब असल्याचे दिसले. चोरट्याने चोरी केली केल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी दुकान परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासून दोन तासात आरोपीला अटक केली. त्याच्याकडून चोरीचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे.त्याने आतापर्यंत चोरीचे किती गुन्हे केले आहेत याची माहिती पोलीस घेत आहेत.

## डोंबिवलीत दूध डेअरीमधून

केली. या दूध डेअरीतून सुनील दुबे (३५) या इसमाला तिकीट काळाबाजार प्रकरणात पोलिसांनी अटक केली आहे. उन्हाळी सुट्टीचा हंगाम सुरू झाला आहे. नागरिकांची मूळ गावी, परप्रांतामधील गावी जाण्यासाठी आरक्षित रेल्वे तिकिटे काढण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे. विशेष करुन कोकण, उत्तर प्रदेशमध्ये जाणाऱ्या प्रवाशांचा सर्वा धिक लोंढा तिकिटे काढण्यासाठी आहे. रेल्वे आरक्षित केंद्रात गेल्यानंतर तिकीट खिडकी उघडल्यानंतर पहिल्या एक मिनिटात ९० हून, १०० हून अधिक रेल्वे तिकिटे आरक्षित झाल्याचा अनुभव प्रवाशांना येत होता.रेल्वे प्रशासनाने रेल्वे तिकिटाचांचा काळाबाजार करणाऱ्या मध्यस्थांचे जाळे यापूर्वीच मोडून काढले आहे. तरीही आरक्षित तिकीट खिडकी उघडल्यानंतर पहिल्या काही मिनिटात तिकिटे आरक्षित होत असल्याच्या तक्रारी रेल्वे प्रशासनाकडे आल्या होत्या. अशाच एका प्रकरणाचा तपास करत असताना, रेल्वे गुन्हे शाखेच्या पथकाला डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानका जवळील कामत मेडिकल स्टोअर्स दुकानासमोरील एका दूध डेअरीमध्ये रेल्वे तिकिटे काळाबाजारात विकली जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. पोलिसांनी या ठिकाणी पाळत घेऊन खात्री केली. या दूध डेअरीत अचानक छापा टाकला. त्यावेळी दूध डेअरीत लांब पल्ल्याच्या गाड्यांची एक लाख ६८ हजार रुपयांची ९४ तिकिटे तपास पथकाला आढळून आली. या डेअरीतून सुनील दुबे या इसमाला पोलिसांनी अटक केली. एका तिकिटामागे ५०० ते एक हजार रुपये प्रति आसन प्रवाशांकडून दुबे वसूल करत होता, अशी माहिती तपासात उघड झाली आहे.रेल्वे पोलीस आयुक्त ऋषी शुक्ला यांच्या आदेशावरुन ही कारवाई करण्यात आली आहे. आतापर्यंत दुबे यांने किती रेल्वे तिकिटांचा काळाबाजार केला आहे. याचा तपास गुन्हे शाखेचे पथक करत आहे.

## ऑन ड्युटी पोलीस अधिकारी

ठाण्यातील पोलीस कर्म चारीयांनी सदरची बाब वरिष्ठांना कळवली. तसेच गिरी यांना व्यवस्थितपणे चालता येत नसल्याचे देखील कळवले. त्यामुळे वरिष्ठांनी याबाबत कायदेशीर कारवाई करण्याची सूचना दिल्याने सुनील गिरी विरोधात औंढा पोलीस ठाण्यात कलम 85 (1) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस कर्म चारी दिलीप किशनराव नाईक यांच्या फिर्या दिनुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पुढील तपास पोलीस निरीक्षक झुंजारे करत आहेत. तर गुन्हा दाखल केल्यावर गिरीला नोटीस देऊन सोडण्यात आले आहे. पोलीस दलात खळबळ...
रात्रीच्यावेळी सर्व सामान्य सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांकडून रात्रीची गस्त केली जाते. तसेच रात्री-बेरात्री अडचणीत असलेल्या नागरिकांच्या मदतीला पोलीस धावून येतात. तसेच रात्री दारू पिऊन रस्त्यावर वाहने चालवणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई देखील करतात. मात्र हिंगोली शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या सहायक पोलीस निरीक्षक सुनील गिरी हे स्वतःच पोलीस गस्तीवर असताना दारूच्या नशेत आढळून आले आहेत. गिरी यांनी एवढ्या मोठ्याप्रमाणावर मद्यपान केले होते की, त्यांना स्वतः उभं राहणं अवघड होत होते. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांकडून नागरिकांनी मदतीची काय अपेक्षा ठेवावी असा प्रश्न उपस्थित होत आहे. तर गिरीवर या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

## एटीएम मशीनमधून पैसे काढून

अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करुन ए.टी.एम. सेंटरमधून पैसे काढण्यात आलेल्या व्यक्तीला बोलण्यात गुंतवून ए.टी.एम. कार्डची अदलाबदल केली. त्याच्या ए.टी.एम. कार्ड मधून 44000 रुपये काढले. त्याच दिवशी दुसऱ्या एकाचे 19000 रुपये या चोरट्यांनी काढले होते. विरारच्या गुन्हे शाखा तीनच्या युनिटने याचा तपास करताना सीसीटीवीच्या आधारे आरोपी साहील सलीम शेख आणि सागर अभिजीत मंडल या दोघांना अटक केली आहे. या दोघांकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली मोटार सायकल, त्याचबरोबर दीड लाखाची रोख रक्कम ही पोलिसांनी हस्तगत केली आहे. दोघेही आरोपी मुंबईचे राहणारे आहेत. त्यांच्याकडून पेल्हार, तुळींज, ठाणे शहर आणि उत्तर प्रदेश येथील ही गुन्हे उघड झाले आहे. या चोरांचे इतर कोणी साथीदार आहेत का? आणि यांनी किती ठिकाणी चोरी केल्या? याचा तपास आता पोलीस करत आहेत. दरम्यान, नागरिकांनी एटीएमचा वापर करताना काळजीपूर्व ककरावा, एटीएम कार्डसह त्याचा पीन नंबर कोणाला देखील कळू देऊ नये, असे आवाहन धुळे पोलिसांनी केले आहे.
ठाण्यात एटीएम कार्ड लंपास करणाऱ्या टोळीचा ठाण्यात पर्दा फाश
ठाणे खंडणी विरोधी पथकाने एटीएम कार्ड चोरणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दा फाश केला आहे. ही टोळी विविध बँकांच्या एटीएम सेंटरमध्ये ग्राहकांना बोलण्यात गुंतवून त्यांचे एटीएम कार्ड अदलाबदल करून लंपास करत असे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या आरोपींची एक विशिष्ट कार्यपध्दती होती. त्यांनी विविध बँकांचे डुप्लिकेट एटीएम कार्डस आधीच बनवून ठेवलेले असायचे. ठाणे जिल्ह्यातील शहरातील विविध शहरांत ते एटीएम सेंटर्समध्ये जात आपले सावज हेरायचे. मग त्यांना मदत करण्याचा बहाण्याने बोलण्यात गुंतवून त्यांचे ओरिजिनल एटीएम कार्डा शी आपल्याजवळचे डुप्लिकेट कार्ड अदला-बदली करायचे.बोलताना कार्डा चा पिन नंबरही सहज काढून घ्यायचे आणि तो ग्राहक बँकेतून गेल्यावर पुन्हा तात्काळ कार्डा चावापर करून पैसे काढून पसार व्हायचे.

## लैंगिक अत्याचारामुळे तरुणीची आत्महत्या

आहे. याप्रकरणी शिळ-डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिडीत मुलगी ही मुळची बिहार येथे वास्तव्यास होते. तिच्या घरची परिस्थिती अत्यंत बेताची असल्याने तिच्या वडिलांनी तिला शिक्षणासाठी चुलत आत्याच्या घरी पाठविले होते. त्यामुळे मागील काही महिन्यांपासून ही मुलगी डायघर येथे राहण्यास आली होती. परंतु गेल्याकाही दिवसांपासून तिच्या आत्याचा दीर हा तिच्यावर लैंगिक अत्याचार करत होता. याबाबत तिने तिच्या वडिलांनाही सांगितले होते. तिचे वडिल तिला घेऊन पुन्हा बिहारला नेणार होते. परंतु गुरुवारी त्या मुलीने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.
शुक्रवारी सायंकाळी तिच्या आत्महत्येची माहिती वडिलांना मिळाली. त्यानंतर मुलीच्या वडिलांनी डायघर पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आधी शाब्दिक चकमक, त्यानंतर दोन्ही

दरम्यान यावरूनच दोघांमध्ये शाब्दिक चकमक सुरू झाली आणि पुढे या वादाचे रूपांतर थेट हाणामारीत सुरु झाले. यावेळी झालेल्या हाणामारीत शेख याकूब यांच्या गटाचे शेख सायराबी याकूब, हीना युसूफ, शेख युसूफ याकूब, शेख याकूब कडू जखमी झाले आहेत. तर शेख नजीर अब्दुल यांच्या गटातील शेख नजीर, जमस्तबी नजीर, युनूस दगडू, मदीनावी दगडू व शेख बादशाह अब्दुल हे जखमी झाले. दरम्यान या हाणामारीत सायराबी यांचं डोकं फुटले असून, शेख नजीर यांच्या कानावर दगड मारल्याने कानातून रक्तस्राव झाला. दरम्यान सर्व जखमींना उपचारासाठी पाचोडच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तर शेख सायराबी याकूब व शेख नजीर अब्दुल या दोघांना शहरातील शासकीय घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलीसांची घटनास्थळी धाव... दरम्यान थेरगाव येथे दोन गटात वाद झाला असून जोरदार हाणामारी झाल्याची माहिती मिळताच पाचोड पोलिसांनी रुग्णालयात आणि थेरगावात धाव घेतली. तसेच जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पोलिसांनी दोन्ही गटाच्या तक्रारीवरून एकमेकांविरुद्ध एकूण 15 लोकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर जखमींवर उपचार सुरु आहे. तर शेख याकूब याचा मुलगा शेख युसूफ याच्या तक्रारीवरून शेख मुनाबी शेख बादशहा, शेख युनूस दगडू शेख जावेद दगडू, नजीर अब्दुल, शेख जमरुतबी नजीर शेख हीना जावेद शेख हसीना युनूस शेख युसूफ नजीर शेख बादशहा अब्दुल, शेख जाबेर नजीर (सर्व रा. धेरगाव) या दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर शेख नजीर याचा भाऊ शेख बादशाह अब्दुल याच्या तक्रारीवरून शेख याकूब कडु, शेख युसूफ याकूब, शेख आयुब याकूब शेख हीना युसूफ, शेख सायराबी याकूब या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलिस निरीक्षक संतोष माने यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार सुधाकर मोहिते, ताराचंद घडे करोत आहे.

## आधी शरीरसंबंध ठेवले अन् एक

पोलिसांनी मोहम्मद अहमद मोहम्मद अली साईन (वय 36) या रिक्षा चालकाला अटक केली आहे. आरोपी रिक्षा चालकाने मृत महिलेसोबत शरीर संबध ठेवले होते. त्यानंतर महिलेने आरोपीकडे एक हजार रुपयांची मागणी केली. त्यावरुन दोघांमध्ये वाद झाला. या वादातून रिक्षा चालकान महिलेच्या डोक्यात सिमेंट कॉंक्रीटचा दगड घालून तिची हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. जंगलात महिलेचा मृतदेह आढळून आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळ परिसरातील संपूर्ण सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तसेच संशयित वाहनांच्या नोंदी घेऊन त्यांची छाननी सुरू केली. त्यातून एका रिक्षामधून एक महिला व रिक्षा चालक हे दोघेही अडवली भुतवली येथील गावदेवी मंदिराकडे जात असल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी रिक्षा चालकाचा शोध सुरू केला. त्यानंतर रिक्षा चालकाला ताब्यात घेऊन त्याची चौकशी सुरू केली. अखेर पोलिसांच्या तपासात त्याने आपला गुन्हा कबुल केला. तुर्भे इंदिरा नगर परिसरातून प्रवासी शोधत असताना सदर महिला प्रवासी म्हणून आरोपीच्या रिक्षात बसली. पुढे अडवली भुतवली परिसरातील निर्जन ठिकाणी आल्यावर महिलेसोबत आरोपीने शरीरसंबंध ठेवले.

## सावधान! बुलढाणा शहर

अज्ञात दुचाकीस्वाराने अडवले. एका घराचा पत्ता विचारत त्याने महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र तोडले. तीन तोळयांचा दागिना घेऊन तो क्षणात पसार झाला. तारा टावरी असे महिलेचे नाव आहे. चोरटा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. माहिती मिळताच शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पुढील तपास सुरू आहे. यापूर्वी, रविवारी रात्री ८ वाजतादरम्यान चिखली मार्गा वरील गोडे यांच्या निवासस्थानाच्या मागील बोळीत रेखा संदेश तायडे यांच्या गळ्यातील पोत समोरून दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात तरुणांनी हिसकावून नेली. तीन तोळयाच्या पोतचा अर्धा भाग तुटून जमिनीवर पडला.जेमतेम दहा दिवसांपूर्वी चिंचोली चौकात मंजू खोब्रागडे यांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून नेल्याची घटना घडली होती. याचा तपास अधांतरी असतानाच दोन महिलांचे दागिने हिसकावण्यात आले आहे. यामुळे सोनसाखळी चोरीच्या वाढत्या घटनांना प्रतिबंध लावण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी विशेष पथक नेमावे, अशी मागणी होत आहे.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार ११ ते १७ एप्रिल - २०२३





## संपादकीय...

# 'फेक न्यूज'वरील गस्त

'फेक न्यूज'ची खातरजमा करून घेण्यासाठी समिती सरकारच नेमणार असेल तर ती निःपक्ष आणि स्वायत्त काम करू शकेल, असे कसे काय मानणार?

प्रसारमाध्यमांवरील सरकारी निर्बंधांची वेगवेगळ्या पातळ्यांवर चर्चा सुरू असतानाच केंद्र सरकारने 'फेक न्यूज'ची खातरजमा करण्यासाठी एक समिती नेमण्याचा निर्णय घेतल्यामुळे पुनश्च एकवार वादाचे मोहोळ उठले आहे. खरे तर 'इलेक्ट्रॉनिक तसेच आयटी' मंत्रालयाने गेल्या जानेवारीतच 'ऑनलाइन' माध्यमांवरील बातम्या तसेच अन्य लेखनाचा खरेखोटेपणा तपासण्यासाठी 'प्रेस इन्फर्मेशन ब्युरो'ला (पीआयबी) सर्वाधिकार देण्याचे जाहीर केले होते.

संबंधित कायद्यातील बदलाचा मसूदाही जाहीर करण्यात आला होता. हा निर्णय अनाकलनीय तर होताच; शिवाय अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या घटनादत्त अधिकाराला छेद देणारा होता. सरकारच्या अखत्यारीतील संस्था अशा प्रकारच्या 'ऑनलाइन' लेखनाची खातरजमा निःपक्षपातीपणे कशी करू शकेल, असा कळीचा प्रश्न त्यावेळी उपस्थित केला गेला. 'एडिटर्स गिल्ड' या पत्रकारांच्या सुप्रतिष्ठित संस्थेने त्याविरोधात आवाज उठवल्यानंतर सरकारने काही काळ हा विषय बासनात बांधून ठेवला होता. पण आता केंद्र सरकारने यासंबंधाच्या कायद्यातील बदलांना अंतिम स्वरूप दिले असून, त्यानुसार 'फेक न्यूज'ची खातरजमा करून घेण्यासाठी एक समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, हे बदल अंतिम स्वरूपात जाहीर करताना, त्यातून 'पीआयबी' म्हणजेच 'पत्र सूचना कार्यालया'चा संदर्भ वगळण्यात आला आहे. ही निव्वळ चलाखी आहे.

एकीकडे पत्रकार तसेच पत्रकारांच्या बड्या संघटनांचा आक्षेप आपण मान्य केला, असा देखावा उभा करतानाच ही समिती मात्र सरकारच नेमणार आहे! याचा अर्थ स्पष्ट आहे. भले आता हे अधिकार 'पीआयबी'कडे नसतीलही; पण या समितीवर कोणास घ्यायचे ते मात्र हे सरकारच ठरवणार आहे आणि गेल्या काही वर्षांत प्रसारमाध्यमांमध्ये पडलेले दोन तट बघता, या समितीवर कोण मान्यवर असतील, हे सांगण्याचीही गरज उरलेली नाही. सरकारने जाहीर केलेल्या या बदलांवर धावती नजर टाकली तरी त्यावरील आक्षेपांमागची भूमिका समजून घेता येते. मुख्य म्हणजे या बदलांमुळे नैसर्गिक न्यायाचे तत्त्व धाब्यावर बसवले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. केंद्र सरकारच्या या समितीने ऑनलाइन माध्यमांवरील लेखनाची खातरजमा केल्यानंतर जर तो मजकूर 'फेक' आहे, असे समितीचे मत झाले, तर संबंधित माध्यमाला तो मजकूर तत्काळ दूर करावा लागणार आहे.

सोशल मीडिया तसेच 'ऑनलाइन' माध्यमे यांवरील 'फेक न्यूज' हा अलीकडल्या काळात चिंतेचा विषय बनला आहे, यात शंका नाही. अफवा पसरवणाऱ्या बातम्या आणि लेखन यामुळे समाजात विद्वेषाचे वातावरण तयार होत चालले आहे. त्यातच चित्रफिती वा ध्वनिफिती यांची छेडछाड करून बड्या बड्यांची बदनामी करण्याचे प्रकार अनेकदा हिंसाचारास कारणीभूत ठरल्याचीही उदाहरणे आहेत. त्यामुळे अशा लेखनासाठी 'फॅक्ट-चेक' म्हणजेच त्याची खातरजमा करून घेण्यासाठी काही एक यंत्रणा असण्याची आवश्यकता आहे, याविषयी दुमत नाही. प्रश्न आहे तो या यंत्रणेच्या निःपक्षपणाचा, स्वायत्ततेचा. हे काम सरकारच्या अखत्यारीतील एखाद्या संस्थेने वा समितीने करणे, हे एकांगी मतप्रवाहास प्रोत्साहन देण्यासारखे आहे.

सर्वोच्च न्यायालयाने चारच दिवसांपूर्वी अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याच्या प्रयत्नांबद्दल नापसंती व्यक्त केली. आता या समितीद्वारे हे सरकार 'ऑनलाइन' माध्यमांतील मजकुरावर नियंत्रण ठेवू इच्छित असल्याचे दिसत आहे. समितीने एखादा मजकूर खोटा ठरवला तर तो संबंधित प्लॅटफॉर्म वरून काढून तर टाकावा लागेलच, पण जर त्याचे पालन झाले नाही, तर या कंपन्यांना सरकारकडून जे कायदेशीर संरक्षण मिळते, तेही काढून घेतले जाईल, अशी तरतूद आय.टी. कायद्यात करण्यात आली आहे. सरकारचा कारभार वा धोरणे यासंबंधातील मजकुराबाबत ही नवी नियमावली सरकारला वारेमाप अधिकार बहाल करते, हा पत्रकार संघटनांचा आक्षेप आहे.




सध्याचे युग हे सोशल मीडियाच्या विळख्यात सापडले आहे आणि त्यामुळे एकंदरीतच समाजाच्या भावविश्वात बेदिली माजली आहे. अर्थात सोशल मीडिया तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमे यांचा हा विळखा काही केवळ आपल्याच देशाला पडला आहे, असे बिलकूलच नाही. जगभरात त्याचे अनिष्ट परिणाम दिसून येत आहेत आणि त्यामुळे खरे आणि खोटे यातील सीमारेषाच पुसून चालली आहे. त्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवायचेच असेल तर ते अधिकार एखाद्या स्वायत्त तसेच स्वतंत्र समितीला द्यायला हवेत आणि त्यात सरकार मग ते कोणत्याही पक्षाचे असो; त्याचा हस्तक्षेप असता कामा नये. या शतकातील विचारवंत युवाल नोहा हरारी यांनी सध्याचे युग हे 'पोस्टट्रूथ'चे युग असल्याचे सांगितले आहे.

'पोस्टट्रूथ युग' म्हणजे केवळ एखादे वास्तवच नव्हे तर इतिहासातील एखादा मोठा कालखंडही 'फेक' ठरवणारे युग! भ्रामक जगाला वास्तव ठरवणाऱ्या या युगात आता हे 'काय खरे- काय खोटे' हे ठरवण्याचे अधिकार एखादे सरकार आपल्या हाती घेत असेल, तर ते लोकशाही मूल्याशी विसंगत आहे.

# आय.जे.आर : न्यायव्यवस्थेत कोणत्या राज्याची कशी अवस्था ?

नुकतेच टाटा ट्रस्ट तर्फे इंडिया जस्टिस रिपोर्ट सन २०२२ हा न्यायव्यवस्थेच्या स्थितीवर प्रकाश टाकणारा अहवाल सन एप्रिल २०२३ ला प्रकाशित करण्यात आला आहे.त्या अहवालामधील वेगवेगळ्या घटकांची आकडेवारी अतिशय बोलकी असून तीने आपल्याला कुंभकर्णी झोपेतून खडबडून जागं करण्यास भाग पाडून रूल ऑफ लॉ शी संबंधित सत्य बाहेर आणले आहे.इंडिया जस्टिस रिपोर्ट,सेंटर फॉर सोशल जस्टिस हे टाटा ट्रस्ट यांचा कॉमन कॉज व कॉमन वेल्थ ह्युमन राइट्स इनिशीएटिव्ह संयुक्त सहकार्याने अहवाल वळोवेळी प्रसिद्ध करण्यात येत असतो.ज्यामध्ये देशातील सर्व घटक राज्याच्या न्यायाच्या स्थितीच्या कामगिरीचे मूल्यांकनासाठी पोलिस,न्यायव्यवस्था,तुरूंग तसेच कायदेशीर मदत अशा बहू मानकांचा विचार करून घटक राज्याच्या कार्यकर्तुत्वाचे मुल्यमापन सदरचा अहवाल करत असते.सन २०२३ साली प्रकाशित झालेल्या अहवालाचे यंदाचे वर्ष हे तृतीय असून तो सर्व प्रथम सन २०१९ मध्ये प्रकाशित झालेला होता.द्वितीय अहवाल सन २०20 मध्ये प्रकाशित झाला होता.यंदाच्या अहवालानुसार एक कोटी पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या अठरा मोठ्या आणि मध्यम आकाराच्या घटक राज्यामध्ये न्यायदानाच्या क्रमवारी मध्ये कर्नाटक घटक राज्याने अव्वल अर्थात प्रथम स्थानी झेप घेतली असून द्वितीय स्थानी तामिळनाडू,तृतीय स्थानी तेलंगणा,चतुर्थ स्थानी गुजरात,पाचव्या स्थानी आंध्र प्रदेश म्हणजे टॉप मध्ये बहूतांश दक्षिण भारतातील राज्ये असून अकराव्या स्थानी यादीत घसरण होत महाराष्ट्राला समाधान मानावे लागले.तर या क्रमवारीमध्ये उत्तर प्रदेश या घटक राज्याला शेवटच्या स्थानावर समाधान मानावे लागले.न्यायदानाच्या मूल्यमापनात महाराष्ट्राची पहिल्या स्थानावरून अकराव्या स्थानावर अधोगती झालेली आहे.तर सदरच्या अहवालानुसार एक कोटी पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या सात लहान घटक राज्यांच्या यादी मध्ये न्यायदानाच्या क्रमवारी सिक्कीम राज्याने अव्वल अर्थात प्रथम स्थानी झेप घेतली असून द्वितीय क्रमांक अरूणाचल प्रदेश,तृतीय क्रमांक त्रिपुरा असून सर्वात शेवटच्या स्थानी गोवा आहे.प्रलंबित खटले,पायाभूत सुविधेची कमतरता,केस क्लिअरन्स रेट (केस डिस्पोजल रेट) अर्थात खटले निकाली काढण्याचा दर उच्च न्यायालयात सहा टक्क्यांनी सुधारला असला तरी कनिष्ठ न्यायालयात ३.६ टक्क्यांनी कमी झाला आहे.दिवसेंदिवस केसेस अधिक दाखल होत असूनही न्यायधीश निवृत्त होते पण,त्या प्रमाणात व रिक्त पदे भरती होत नाही.न्यायालयीन कामाला गती देण्यासाठी न्यायालयीन अधिकारी वर्गा ला,पोलिस अधिकारी कर्म चारी वर्गा ला,तुरुंग अधिकारी कर्म चारी वर्गा ला आधुनिक पध्दतीने अपराध्याकडून करण्यात येणारे गुन्हे डोळयासमोर ठेवून वेळोवेळी कर्म चाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.देशातील,राज्यातील कारागृहात तुंबलेली गर्दी यावर वेळीच उपाय शोधणे गरजेचे आहे.आपल्या देशात लोकसंख्या भरमसाठ असून त्यातही तरूणांची संख्या अधिक आहे.त्याचा लाभांश तरूणांच्या व तरुणींच्या हातात काम देऊन,त्यांना कौशल्य आधारित व्यावसायाभिमूख शिक्षण देऊन अधिकाधिक लाभांशाचा वाटा उचलायला हवा.पोलिस विभागातील,कारागृह विभागातील,न्यायव्यवस्थेतील रिक्त पदांची भरती वेळेवर करीत प्रशासकीय कामाचा टक्का वाढवायला हवा.आज देशातील,राज्यातील जवळजवळ सर्व च तुरुंग कोंडवाड्यासारखे खच्च भरून आहेत.तिथे क्षमतेपेक्षा अधिक कैद्यांना ठेवल्याने आणि तुरुंग रक्षक,कारागृह अधीक्षक,क्लर्क आणि इतर स्टाफ यांची पदे रिक्त असल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येऊ शकतो.राष्ट्रिय स्तरावर तुरुंगातील प्रती कैदी वार्षिक सरासरी खर्च ४३,०६२ रूपये वरून कमी करून ३८,०२८ रु. करण्यात आलेला आहे.तुरुंगामध्ये एका कैद्यावर वार्षिक सर्वाधिक खर्च आंध्र प्रदेश करीत असून तो २,११,१५७ रू.एवढा आहे.तसेच या अहवालानुसार तेलंगणा ने मोठ्या आणि मध्यम आकाराच्या घटक राज्यामध्ये चांगली कामगिरी करीत पोलिस क्रमवारीत अव्वल स्थान प्राप्त केले आहे.असे असले तरी राष्ट्रिय स्तरावर पोलिस कॉन्स्टेबल ची बावीस टक्के तर पोलिस अधिकाऱ्यांचे एकोणतीस टक्के पदे रिक्त आहेत.पोलिसांची एवढ्या मोठ्या प्रमाणात पदे जर रिक्त असेल तर सभ्यतेची झुल पांघरलेल्या आरोपीचे मुखवटे ओरबाडून काढायचे कसे ? सायबर भामट्यांना पोलिसी खाक्या दाखवायच्या कशा ? यावर आत्मचिंतन करायला हवे.भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्यांना सीसीटीव्ही कॅमेरे लावण्या बाबत निर्देश दिले असतांनाही सदरचा अहवाल सांगतो की,चार पोलिस ठाण्या पैकी एक पोलिस ठाण्यात एकही सीसीटीव्ही कॅमेरे नाही.मग अधिकाऱ्यांनी करडी नजर ठेवायची कशी ? विधी आयोगाने १९८७ ला शिफारस केली होती की,प्रती दहा लाख व्यक्तींच्या मागे किमान पन्नास न्यायाधीशांची आवश्यकता आहे.परंतु,याउलट वर्तमानात आज त्याचे प्रमाण प्रती दहा लाख व्यक्तींच्या मागे एकोणीस एवढीच आहे.१.४ अब्ज लोकसंख्या अर्थात १४० करोड व्यक्तींसाठी भारतात 'न्याया' करीता केवळ २०,०७६ एवढे न्यायाधीश असून देशातील उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या तीस टक्के जागा रिक्त आहे.त्या रिक्त जागांचे ग्रहण कधी सुटेल ? हे तूर्तास तरी आज सांगणे कठीण आहे.म्हणजेच केवळ २०,०७६ न्यायाधीशांच्या डोईवर देशात 'न्यायदानाचा गाडा' हाकला जात आहे.पोलिस,न्यायव्यवस्था,तुरूंग आणि कायदेशीर मदत या चार मानकाची अवस्था,स्थिती ही न्यायव्यवस्थेला नेहमीच नव नवे आयाम देत असते.हा अहवाल भविष्यात महाराष्ट्रा पुढे काय वाढून ठेवणार आहे ? याची आपल्या राज्यातील या चार मानकांच्या कामगिरीवरून पुसट कल्पना आपल्याला यायला हवी की आपले स्थान कसे असेल ?.सर्वात महत्त्वाचे अधोरेखित करण्यासारखी बाब म्हणजे घड्याळाचे काटे उलटे फिरवत मागे आल्यावर कळेल की,महाराष्ट्र सदरच्या अहवालात प्रथम आणि द्वितीय अहवालानुसार अव्वल स्थानी होता.परंतु,यंदाच्या तिसऱ्या रिपोर्ट नुसार महाराष्ट्र राज्य हे या यादीमध्ये लोकांना न्याय प्रदान करण्याच्या संदर्भात अकराव्य स्थानी फेकल्या गेल्याने आपल्याला ऐतिहासिक प्रवासाचा विसर न पडता येथील लोकांना सुलभ तथा सुगम न्याय,कायदेविषयक सहाय्य,तुरुंग प्रशासन,पोलिस प्रशासन अधिकाधीक लोकाभिमुख करून "न्याया" चा शिवधनुष्य पेलावा लागणार आहे.

**©ॲड.संदिप गुजरकर**
**यवतमाळ**

# वृद्धत्व पायापासून वरच्या दिशेने सुरू होते !

## पाय सक्रिय आणि मजबूत ठेवा !!

■ जसे वर्षे घालवतो तसे रोज म्हातारा होत असतो,पाय नेहमी सक्रिय आणि मजबूत असले पाहिजेत. जसजसे सतत म्हातारे होत असतो/वृद्ध होत असतो,तस तसे केस राखाडी होण्याची/ त्वचा निस्तेज/ चेहऱ्यावर सुरकुत्या पडण्याची भीती बाळगू नये.

दीर्घायुष्य प्रदीर्घ तंदुरुस्त आयुष्याच्या लक्षणांपैकी लोक प्रिय यूएस मॅगझिन"प्रिव्हेन्शन" द्वारे सारांशित केले आहे,पायां चे मजबूत स्नायू सर्वात महत्त्वाचे आणि आवश्यक म्हणून शीर्षस्थानी सूचीबध्द आहेत.कृपया दररोज चालत जा.

■ जर फक्त २ आठवडे पाय हलवले नाही तर पायाची खरी ताकद १० वर्षांनी कमी होईल.

फक्त चाला

■ डेन्मार्कमधील कोपनहेगन विद्यापीठाच्या एका अभ्यासात असे आढळून आले आहे की वृद्ध,तरुण २ आठवड्यांच्या निष्क्रियता दरम्यान,पायां च्या स्नायूंची ताकद एक तृतीयांश कमकुवत होऊ शकते* जे २०-३० वर्षांच्या वृद्धत्वाच्या समतुल्य आहे!!

म्हणून फक्त चाला

■ पायाचे स्नायू कमकुवत झाल्यामुळे नंतर पुनर्वसन व व्यायाम केले तरीही ते बरे होण्यास बराच वेळ लागेल.

म्हणून चालण्यासारखा नियमित व्यायाम खूप महत्त्वाचा आहे

■ संपूर्ण शरीराचे वजन/भार शिल्लक राहून पायांवर विश्रांती घ्या.

■ पाय हे १ प्रकारचे खांब आहेत,जे मानवी शरीराचे संपूर्ण भार सहन करतात.

■ रोज चाला.

■ मजेची गोष्ट म्हणजे,माणसा च्या ५०% हाडे, ५०% स्नायू २ पायांत असतात.चालत जा

■ मानवी शरीरातील सर्वात मोठे व मजबूत सांधे,हाडे देखील पायांमध्ये असतात.

■ 10K पावले/दिवस

■ मजबूत हाडे,मजबूत स्नायू, लवचिक सांधे लोह त्रिकोण बनवतात जो सर्वात महत्वाचा भार वाहतो म्हणजेच मानवी शरीर"

■ ७०% मानवी क्रियाकलाप व व्यक्तीच्या जीवनातील ऊर्जा बर्न दोन पायांनी केली जाते.

■ हे माहीत आहे का?जेव्हा एखादी व्यक्ती तरुण असते तेव्हा तिच्या मांडीत ८०० किलो वजनाची छोटी गाडी उचलण्याइतकी ताकद असते

■ पाय हे शरीराच्या हालचाली चे केंद्र आहे

■ दोन्ही पायांना मिळून मानवी शरीराच्या ५०% नसा, ५०% रक्तवाहिन्या आणि ५०% रक्त त्यामधून वाहत असते.

■ हे शरीराला जोडणारे सर्वात मोठे रक्ताभिसरण नेटवर्क आहे. म्हणून रोज चाला

■ फक्त जेव्हा पाय निरोगी असतात तेव्हाच रक्ताचा प्रवाह सुरळीत होतो,त्यामुळे ज्यांच्या पायाचे स्नायू मजबूत असतात त्यांचे हृदय नक्कीच मजबूत असते.* चाला.

■ वृध्दत्व पायापासून वरच्या दिशेने सुरू होते

■ एखादी व्यक्ती मोठी होते, मेंदू,पाय यांच्यातील सूचनांच्या प्रसारणाची अचूकता व गती कमी होते,ती व्यक्ती तरुण असताना कमी होते.कृपया चालत जा

■ याशिवाय,तथाकथित हाडां चे खत कॅल्शियम कालांतराने लवकर/नंतर नष्ट होते,ज्यामुळे वृध्दांना हाडे फ्रॅक्चर होण्याची अधिक शक्यता असते.वृद्धां मध्ये हाडांचे फ्रॅक्चर सहजपणे अनेक गुंतागुंत निर्माण करू शकतात. विशेषतः मेंदूच्या थ्रोम्बोसिससारखे घातक रोग.

■ हे माहीत आहे का ? साधारणपणे १५% वृद्ध रूग्ण जास्तीत जास्त मरतात. १ वर्षा च्या आत मांडीचे हाड फ्रॅक्चर! रोज न चुकता चाला

■ पायांचा व्यायाम,वयाच्या ६० वर्षा नंतरही कधीही उशीर होत नाही

■ पाय कालांतराने हळूहळू म्हातारे होत असले तरी,पाय/पायांचा व्यायाम करणे हे आयुष्यभराचे काम आहे.

■ 10,000 पावले चाला

■ केवळ नियमितपणे पाय बळकट केल्याने पुढील वृद्धत्व टाळता येते/कमी करता येते. ३६५ दिवस चाला

■ पायांना पुरेसा व्यायाम मिळावा,पायाचे स्नायू निरोगी राहतील याची खात्री करण्या साठी कृपया रोज किमान ३०- ४० मिनिटे चाला.

■ तुम्ही ही महत्त्वाची माहिती तुमच्या 40+ मित्र आणि कुटुंबातील सदस्यांसोबत शेअर केली पाहिजे, कारण प्रत्येकजण दररोज वृद्ध होत आहे

# पवारांची अदानी-अदा !

शरद पवार यांनी 'एनडीटीव्ही'स गौतम अदानी यांच्याबाबत मुलाखत देणे हे 'सामना'स शिवसेनेविषयी मुलाखत देण्यासारखेच. एके काळी बाणेदार पत्रकारितेसाठी ओळखली जाणारी 'एनडीटीव्ही' वाहिनी अदानी यांच्या हाती गेल्यापासून तिच्यात झालेला बदल लक्षणीय म्हणावा असा. या वाहिनीस पवार यांनी दिलेली मुलाखत सध्या राजकारण पत्रपंडितांत चर्चेचा विषय झाली असून वेळ घालवण्यास अन्य काही बुद्धिगम्य उद्योग नसलेले या क्षेत्रातील अनेक जण आपापल्या मगदुराप्रमाणे मांडणी करून यावर अहमहमिकेने लढताना दिसतात. खुद्द पवार यामुळे अतीव आनंदात असतील. समोरच्या अनेकांस झुंजावयास लावून आपण नामानिराळे राहात या झुंजींची मजा घेणे ही त्यांची जुनी सवय. त्यामुळे या मुलाखतीमुळे दिल्लीपासून गल्लीपर्यंत काहूर निर्माण झाले असले तरी इतका काही राष्ट्रीय चर्चा काल त्यावर व्यतीत करण्याचे कारण नाही. वास्तविक अशी काही मुलाखत देणे ही पवार यांची गरज होती आणि त्याहूनही ती घेणे ही एनडीटीव्हीची निकड होती. अदानींच्या गोठ्यात बांधले गेल्यापासून या वाहिनीने लक्षात घ्यावे असे काही वृत्तांकन केलेले नाही. तेव्हा दखलपात्रतेच्या निकषावर काही तरी दिलखेचक करणे या वाहिनीसाठी आवश्यक होते. त्यासाठी तिने घरचाच, आणि त्यातही मालकाचाच, विषय निवडला. आणि त्यासाठी शरद पवार यांची रास्त निवड केली. या मुलाखतीत पवार जे बोलले ते बोलले. त्यामुळे कबुतरांच्या घोळक्यात मांजर घुसल्यासारखी अनेकांची प्रतिक्रिया झाली असली तरी त्यांच्या भाष्यामुळे विरोधकांची कमी आणि सत्ताधारी तसेच त्या पक्षाच्या नवनैतिक समर्थकांची अधिक पंचाईत होणार आहे. कशी, हे लक्षात घेताना नरेंद्र मोदी-अमित शहा-चलित भाजप, शरद पवार आणि अदानी या त्रिकोणावर भाष्य करणे आवश्यक. याचे कारण अदानी हे अलीकडच्या काळात वादाच्या केंद्रस्थानी येण्याच्या किती तरी आधीपासून ते पवार यांच्या प्रभावशाली व्यक्तींच्या वर्तुळाचे अविभाज्य घटक आहेत. मुंबईत २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात 'ताज' हॉटेलात अडकून पडलेल्या अदानी यांना जिवानिशी बाहेर पडण्यास मदत झाली ती पवार यांच्या हस्तक्षेपाची. त्या वेळी महाराष्ट्रात काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार होते आणि दिल्लीत मनमोहन सिंग सरकारात पवार हे मंत्री होते. त्याआधी आणि नंतरही अदानी यांना विदर्भात कोळसा खाण कंत्राट देण्याचा आग्रह पवार यांचा होता आणि त्यासाठी तत्कालीन पर्यावरणमंत्री जयराम रमेश यांच्याशी पवार यांनी जाहीर दोन हात केले होते. त्या वेळी पवार यांना धडा शिकवण्याची काँग्रेस नेतृत्वाची खुमखुमी कायम होती. त्यातूनच अदानी यांचे खाण प्रकरण आणि लवासा या दोन प्रकल्पांवर वाद निर्माण केले गेले. पुढे या प्रकल्पांचे काय झाले हा इतिहास ताजा आहे. त्यानंतर २०१४ च्या निवडणुकांआधी पवार यांचे अदानी यांच्या माऊंट अबू येथील निवासस्थानचे वास्तव्य हेदेखील मोठाच धुरळा उडवून देणारे ठरले. त्या वेळी पवार आणि अदानी हे दोन दिवस एकत्र होते आणि त्यामुळे



काँग्रेस-राष्ट्रवादी युती तुटणार अशी अटकळ काही विद्वान पत्रपंडितांनी बांधून तशी वातावरणनिर्मिती केली होती. प्रत्यक्षात तसे काही घडले नाही. दोन वर्षांपूर्वी पवार, अदानी आणि अमित शहा या तिघांत अहमदाबाद येथे झालेल्या भेटीबाबतही असाच वादंग निर्माण केला गेला. त्याचाही रोख अदानी हे पवार यांचा राष्ट्रवादी आणि भाजप यांच्यात समेट घडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याबाबत सांगितले गेले. ते शुद्ध बिनडोकपणाचे होते. याचे कारण पवार काय वा शहा काय! या मंडळीस राजकीय चर्चा करण्यासाठी अदानींची अजिबात गरज नाही. आणि दुसरे असे की राजकीय पक्षांतील करार-मदारांसाठी अशा उजळ भेटींची आवश्यकता नसते. तेव्हा अशा भेटी, चर्चा यामुळे उडणारा धुरळा हा मतलबी असतो आणि तो अनेकांच्या डोळ्यांत जाऊन त्यांस स्वच्छ दिसू नये असाच विचार त्यामागे असतो. पवार यांच्या ताज्या मुलाखतीबाबतही हेच म्हणता येईल.

'पवार यांच्या अदानीबाबतच्या भूमिकेमुळे विरोधी ऐक्यास सुरुंग', 'पवार यांनी काँग्रेसची साथ सोडली', 'विरोधी आघाडीस निर्मितीआधीच तडा' आदी प्रकारच्या बातम्या/चर्चा/विश्लेषणे यांचा धबाबा मुलाखतीनंतर सुरू झाला असला तरी प्रत्यक्षात या मुलाखतीमुळे सत्ताधारी भाजप आणि त्या पक्षाचे समाजमाध्यमवीर यांस अधिक कानकोंडे व्हावे लागणार आहे. याचे कारण असे की ही मुलाखत अदानी या संवेदनशील मुद्द्यावर पवार आणि देशाचे सर्व सामर्थ्यवान, सार्वजनिक जीवनातील नैतिकतेचे आदर्श जे की पंतप्रधान नरेंद्र मोदी या दोहोंस एकाच तागडीत बसवते. एरवी उठता-बसता पवार यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप वगैरे करणाऱ्या नवनैतिक नवमध्यमवर्गीयांची यामुळे एकच अडचण होणार. 'पाहा.. पवार कसे अदानी यांस वाचवू पाहतात' असे कुत्सित स्वरांत या मुलाखतीनंतर म्हणण्याची सोय नाही कारण असे म्हणू पाहणाऱ्यांच्या आदर्शाचे मेरुमणीही तेच करू पाहतात. आणि उलट बाजूने पवार यांचे साफ चुकले असे म्हणावे तर तसे केल्यास अदानीविरोधात चौकशीची मागणी न्याय्य ठरवण्याचे आणि त्यातून आपल्या सर्वोच्च नेत्याविरोधात मत व्यक्त करण्याचे धर्मसंकट. त्यामुळे पवार यांनी ही मुलाखत देऊन आणि त्यातही अदानीप्रकरणी संयुक्त संसदीय समितीच्या चौकशीची मागणी अनावश्यक ठरवून या अशा अध्य्राकच्च्या नवनैतिकतावाद्यांस अधिक अडचणीत आणले आहे. पंतप्रधान मोदी यांसही अदानीप्रकरणी संयुक्त संसदीय चौकशी नको आहे आणि पवार यांचेही म्हणणे तेच आहे हे सत्य अनेकांच्या पचनशक्तीवर परिणाम करणारे ठरते. या प्रसंगाची तुलना पंतप्रधानपदी विराजमान झाल्यावर मोदी यांनी बारामतीस दिलेल्या भेटीशी होऊ शकते किंवा काय हे पाहायला हवे. अलीकडेच अदानी यांनीही बारामतीचा दौरा केला त्या वेळी पुढच्या पिढीचे रोहित पवार यांनी त्यांच्या वाहनाचे सारथ्य केले याचेही स्मरण छातीतील जळजळ वाढवणारे ठरू शकेल.

राहता राहिला मुद्दा विरोधी ऐक्याचा. त्याचा आणि अदानी संबंधांत पवार यांच्या भूमिकेचा काडीमात्रही संबंध नाही. या मुलाखतीतील पवार-भाष्य हे राष्ट्रवादीच्या भाजपविषयक भूमिकेतील सौहार्द सूचक आहे असे सुचवणारे एक तर काँग्रेसी आहेत; किंवा भाजप-स्नेही आशावादी. काँग्रेसमधील गांधी परिवार निष्ठावानांचा हा जुना उद्योग. महाराष्ट्रात पवार यांचे पाय कापणे, बंगालात ममता बॅनर्जींची कोंडी करणे आदी उद्योगांमुळे काँग्रेसने स्वहस्ते स्वपक्षीय नेतृत्व संपवले. बरे इतके करून नवे नेतृत्व दिले असते तर ते एक वेळ क्षम्य ठरले असते. पण नवे काही देता येत नाही आणि जुने मात्र संपवण्याचा सोस असे काँग्रेसचे झाले. त्यामुळे त्या पक्षाची ही अशी दशा झाली. तथापि इतकी टेंगळे कपाळावर आल्यामुळे का असेना आता तरी तो पक्ष शहाणा झालेला दिसतो. पवार यांच्या वक्तव्यावर त्या पक्षातील ज्येष्ठांनी काही तीव्र भाष्य केलेले नाही. एके काळी पवार यांच्याविरोधात उभे ठाकणारे जयराम रमेश यांच्यासारखेही या मुलाखतीनंतर सावध पवित्रा घेतात हे त्या शहाणपणाचे लक्षण. तेव्हा पवार यांच्या या वक्तव्यामुळे अदानी हा मुद्दा अजिबात दूर होणारा नाही. उलट पवार यांची ही अदानी-अदा सत्ताधाऱ्यांच्या पवार यांच्यावरील हल्ल्याची धार बोथट करणारीच ठरेल.

## पोलिसांना पिटाळून लावण्यासाठी 'त्या' महिलांनी विवस्त्र होत घातला धिंगाणा; कल्याणमधील धक्कादायक घटना




कारवाईसाठी आलेल्या पोलिसांना पिटाळून लावण्यासाठी महिलांनी चक्क विवस्त्र होत धिंगाणा घातला. त्यामुळे झालेल्या गदारोळात या महिलांना पळ काढला. आता, पोलिसांकडून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. कल्याणमध्ये ही धक्कादायक घटना घडली आहे. पोलिसांच्या कारवाईपासून वाचण्यासाठी महिलांनी असे पाऊल उचलल्याने सगळीकडे या घटनेची चर्चा होत आहे.

प्रकरण काय? कल्याण रेल्वे पोलिसांनी एका मोबाईल चोराला अटक केली. त्याने चोरलेला मोबाईल राहत असलेल्या ठिकाणी लपवून ठेवला होता. हा मोबाईल घेण्यासाठी चोर राहत असलेल्या ठिकाणी गेलेल्या पोलिसांना पिटाळून लावण्यासाठी तीन महिलांनी चक्क आपले कपडे उतरवले. हा प्रकार पाहून पोलिसांनाच घाम फुटला. कसे बसे पोलिसांनी ही परिस्थिती शांत केली. या धिंगाणा घालणाऱ्या या महिलांनी गर्दीचा फायदा घेत तेथून काढता पाय घेतला. कल्याण रेल्वे स्थानकात चोरीच्या घटना घडत असतात. असाच एक प्रकार काही दिवसापूर्वी घडला होता. एका प्रवाशाचा मोबाईल चोर घेऊन पसार झाला. या प्रवाशाने कल्याण जीआरपीमध्ये तक्रार दिली. या तक्रारीनंतर कल्याण जीआरपीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु केला. ही चोरीची घटना सीसीटीव्हीत कैद झाली होती. पोलिसांनी चोराला अटक केली. संजय भोसले असे या चोराचे नाव आहे. त्याला अटक केल्यानंतर जेव्हा पोलिसांनी चोरलेला मोबाईल कुठे आहे. तेव्हा त्याने सांगितले की, तो मोबाईल घरी आहे. महिला पोलिसांचे पथक त्याच्या घरी पोहचले. पोलिसांना पाहताच घरातील तीन महिलांनी धिंगाणा घालायला सुरुवात केली. अंगावरील कपडे काढून जोराने आरडाओडा सुरु केला. कल्याण रेल्वे यार्डा पासून ते कर्पे वाडी परिसरात हा धिंगाणा सुरु होता. कसे बसे पोलिसांनी ही परिस्थिती शांत केली. हा धिंगाणा घालणाऱ्या या महिलांनी गर्दीचा फायदा घेत तेथून काढता पाय घेतला. कल्याण जीआरपीने सार्वजनिक ठिकाणी कपडे काढून धिंगाणा घालणाऱ्या महिलांच्या विरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरु केला आहे.

## छत्रपती संभाजीनगरच्या राड्यातील आठ जणांचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

छत्रपती संभाजी नगरमधील राड्या प्रकरणात अटकेत असलेल्या आठ आरोपींचा जामीन कोर्टाने शुक्रवारी (7 एप्रिल) फेटाळला.छत्रपती संभाजीनगर शहरापासून जवळच असलेल्या ओहर गावात 31 मार्च रोजी दोन गटात वाद झाला होता. वादाचं रुपांतर दगडफेकीत झाल्याने गावात तणावाचे वातावरण निर्मा ण झाले होते. मात्र पोलिसांनी तात्काळ गावात धाव घेऊन, परिस्थिती नियंत्रणात आणली होती. तर या प्रकरणी पोलिसांनी गुन्हे दाखल करत आरोपींची धरपकड सुरु केली आहे. अटकेतील आठ आरोपींनी नियमित जामिनीसाठी अर्ज केला होता. मात्र प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एम. एम. माळी यांनी शुक्रवारी आठ जणांचा जामीन अर्ज फेटाळला.



संभाजीनगरच्या जटवाडा रोडवरील ओहर गावात बॅनर फाडल्याप्रकरणी दोन गटांत झालेल्या राड्याप्रकरणातील आठ आरोपींचा नियमित जामीन अर्ज प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एम. एम. माळी यांनी शुक्रवारी फेटाळून लावला आहे. भास्कर लिंबाजी पिठोरे (वय 26 वर्षे), अजय दीनानाथ भालकर (वय 34 वर्षे), मोसीन खान मोईन खान पठाण (वय 33 वर्षे), मुजफ्फर मन्सूर पठाण (वय 25 वर्षे), फयाज हारुनखाँ पठाण (वय 19 वर्षे), मोसीन रशिदखाँ पठाण (वय 22 वर्षे), मुस्तकिन नसीरखाँ पठाण (वय 32 वर्षे) आणि खान समीर अकबर ऊर्फ एमडी समीर (वय 23 वर्षे, सर्व रा. ओहरगाव) अशी आरोपींची नावे आहेत.

**यामुळे जामीन नाकारला...**

दरम्यान पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींकडून न्यायालयात नियमित जामीन अर्ज दाखल करण्यात आला होता. दरम्यान याचवेळी सरकारी वकिलांनी जामीन देण्यावर आक्षेप घेत, आरोपींच्या साथीदारांना अटक करायची आहे. गुन्ह्यात वापरलेली हत्यारे हस्तगत करायची आहेत. आरोपींना जामीन दिल्यास पुन्हा दंगल उसळण्याची शक्यता नाकारता येत नाही,

असे म्हणत सहाय्यक सरकारी वकील शशिकांत इघारे यांनी आरोपींच्या जामीन अर्जा ला विरोध केला होता. दरम्यान न्यायालयाने आठही आरोपींची जामीन फेटाळून लावली आहे.

**किराडपुरा राड्याप्रकरणी तिघांना 10 एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी**

छत्रपती संभाजीनगर शहरातील किराडपुरा भागात झालेल्या राड्याप्रकरणी पोलिसांनी आणखी तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. दरम्यान त्यांना 10 एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एम. एम. माळी यांनी दिले आहे. सलमान खान हारुण खान (वय 24 वर्षे, रा. गणेश कॉलनी), शेख फैजान शेख मेहराज (वय 20 वर्षे, रा. किराडपुरा) आणि शेख सर्फराज शेख शफिक (रा. रहेमानिया कॉलनी) अशी आरोपींची नावे आहेत. तर तीनही आरोपींना पोलीस कोठडी देण्याची विनंती सहाय्यक सरकारी वकील शशिकांत इघारे यांनी न्यायालयाकडे केली होती, आणि न्यायालयाने ती मान्य करत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## उद्धव ठाकरेंना आणखी एक धक्का

## शिवसेनेच्या पक्षनिधीवर स्थगिती आणा, शिवसेना भवन शाखा ताब्यात घ्या; सर्वोच्च न्यायालयात याचिका

शिवसेना पक्षाचा निधी सध्या ठाकरे गटाकडे आहे. शिंदे गटाच्या हातात हा पक्षनिधी जाऊ नये, यासाठी ठाकरे गट हा निधी इतरत्र वळवण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिवसेनेच्या पक्षनिधीच्या वापरावर स्टे आणावा, अशी याचिका सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली आहे.

**शिंदे गटाकडून याचिका नाही**

वकील आशिष गिरी यांनी ही याचिका दाखल केली असून पक्षनिधीसोबतच शिवसेना भवन, शिवसेनेच्या सर्व शाखा व मालमत्ता गोठवाव्यात, अशी महत्त्वपूर्ण मागणी त्यांनी याचिकेत केली आहे. तसेच, आपण ही याचिका शिंदे गटाकडून दाखल केलेली नाही. तर, महाराष्ट्राचा नागरिक म्हणून सर्वोच्च न्यायालयात याचिका केल्याचेही आशिष गिरी यांनी स्पष्ट केले.




**पक्षनिधी इतरत्र जाऊ नये**

वकील आशिष गिरी म्हणाले की, प्रसारमाध्यमांत ठाकरे गटाकडून शिवसेनेचा पक्षनिधी इतरत्र वळवण्यात येईल, असे वृत्त आहे. शिवसेनेचा हा पक्षनिधी इतरत्र जाऊ नये, यासाठी सुप्रीम कोर्टाने कोर्ट रिसिव्हर नियुक्त करुन ही मालमत्ता ताब्यात घ्यावी. हा पक्षनिधी इतरत्र जाऊ नये, एवढीच माझी भूमिका आहे. शिवसेना कुणाची?, यावर सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतर ही संपत्ती उद्धव ठाकरे किंवा एकनाथ शिंदेंकडे सोपवावी.

अॅड. आशिष गिरी म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत केवळ पक्षनिधीच नव्हे तर शिवसेना भवन व शिवसेनेच्या शाखांच्या वापरावरही स्टे आणावा. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यावर शिवसेनेच्या अध्यक्षांकडे सर्व पक्षनिधी व मालमत्ता वर्ग करावे.

**24 एप्रिलला सुनावणी घ्यावी**

राज्यातील सत्तासंघर्षा वर येत्या 24 एप्रिलला सुनावणी होणार आहे. त्याचवेळी या याचिकेवरही सुनावणी घ्यावी, अशी मागणी अॅड. आशिष गिरी यांनी केली आहे. आशिष गिरी म्हणाले की, केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना ही एकनाथ शिंदेंची असल्याचे सांगितल्यानंतर या निर्णयाविरोधात उद्धव ठाकरे सर्वोच्च न्यायालयात आले आहेत. शिवसेनेच्या मालमत्तेशी निगडीत प्रकरण याच्याशीच संबंधित असल्याने आम्ही या प्रकरणाची 24 एप्रिललाच सुनावणी घेण्याची मागणी केली आहे. याच कारणामुळे हायकोर्टा तन जाता थेट सर्वोच्च न्यायालयात याचका दाखल केल्याचे अॅड. आशिष गिरी यांनी सांगितले.

मातोश्रीवर दावा नाही

उद्धव ठाकरेंचे निवासस्थान असलेल्या मातोश्रीसंबंधी आमचा कोणताही दावा नाही, असेही अॅड. आशिष गिरी यांनी सांगितले.

आशिष गिरी म्हणाले की, मातोश्री ही रहिवासी मालमत्ता आहे. शिवसेना पक्षाशी त्याचा संबंध नाही. मात्र, शिवसेनेशी निगडीत सर्व संघटना त्यामध्ये शिवाई ट्रस्टचाही समावेश आहे, त्या सर्व संघटनांच्या मालमत्ता गोठवण्याची आमची मागणी आहे.

## राष्ट्रवादी कॉंग्रेसला मोठा धक्का

## राष्ट्रीय पक्षाचा दर्जा रद्द

केंद्रीय निवडणूक आयोगाने शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला देण्यात आलेला राष्ट्रीय पक्षाच्या दर्जा काढून घेतला आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आता राष्ट्रीय पक्ष म्हणून आवश्यक असलेला पूर्तता पूर्ण करत नसून त्यामुळे पक्षाचा राष्ट्रीय पक्ष हा दर्जा कढून घेण्यात आला आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी कॉंग्रेसला स्थानिक किंवा राज्य स्तरावरील पक्ष असा दर्जा दिला जाईल. पक्षाची पुढील भूमिका काय असेल हे ठरवलं जाईल असं पक्षाचे खासदार सुनील तटकरेंनी 'झी 24 तास'शी बोलताना सांगितलं. राष्ट्रवादीबरोबरच सीपीआय आणि ममता बॅनर्जींच्या तृणमूल कॉंग्रेस पक्षालाही निवडणूक आयोगाने धक्का देत राष्ट्रीय पक्षाचा दर्जा काढून घेतला. तर अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टी या पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा देण्यात आला आहे.




**राष्ट्रीय पक्ष दर्जा मिळवण्या-साठीचा निकष काय?**

देशातील कोणत्याही राजकीय पक्षाला राष्ट्रीय पक्ष हा दर्जा देण्यासंदर्भातील काही नियम आणि निकष आहेत. यापैकी सर्वात महत्त्वाचा निकष हा या संबंधित पक्षाचे किती लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत. पक्षाच्या उमेदवारांना 4 किंवा त्याहून अधिक राज्यांमधील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये एकूण मतदानाच्या 6 टक्के मतं मिळणं आवश्यक असतं. तसेच लोकसभेमधील 2 टक्के जागा पक्षाकडे असतील तरच त्याला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा दिला जातो. त्याचप्रमाणेच लोकसभेमध्ये ज्या पक्षाचे 3 राज्यांमधून किमान 11 खासदार असतील तरच पक्षाला राष्ट्रीय पक्ष दर्जा दिला जातो. राष्ट्रीय पक्ष हा दर्जा असलेल्या राजकीय पक्षांना अनेक फायदे मिळतात. राष्ट्रीय पक्षांना देशातील सर्व राज्यांमध्ये एकाच निवडणूक चिन्हावर लढता येतं. राष्ट्रीय पक्ष असलेल्या राजकीय पक्षांना नवी दिल्लीत पक्ष कार्यालयासाठी जागा मिळते.

## उल्हासनगर हादरलं ! भररस्त्यात आढळला अनोळखी तरुणाचा मृतदेह



उल्हासनगर : रविवारी सकाळी 11 वाजण्याच्या सुमारास उल्हासनगरमध्ये घडलेल्या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. उल्हासनगमध्ये कॅम्प नंबर तीनच्या फार्व्हड लाईन राधास्वामी चौकात हा धक्कादायक प्रकार घडला आहे. राधास्वामी चौकात असलेल्या उंबराच्या झाडाला एक तरुण लटकलेल्या अवस्थेत नागरिकांना दिसला. या तरुणाने आत्महत्या केल्याचे म्हटले जात आहे. या घटनेची माहिती स्थानिक पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी (Ulhasnagar Police) घटनास्थळी पोहचत मृतदेह ताब्यात घेतला आहे. भररस्त्यात तरुणाचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. स्थानिकांनी याची माहिती तात्काळ पोलिसांना दिली. उल्हासनगर पोलिसांनी घटनास्थळी पोहचून पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात हलवला आहे. या तरुणाची अद्याप ओळख पटलेली नाही. दरम्यान, हा तरुण याठिकाणी कसा आला तसेच त्याने इतक्या टोकाचं पाऊल का उचललं याचा अधिक तपास पोलीस करत आहेत. भर चौकात घडलेल्या ह्या प्रकरणानंतर बघ्यांची गर्दी मोठ्या प्रमाणात झाली होती. चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यात दारूच्या आहारी गेलेल्या एका पित्याने पोटच्या मुलाची गळा दाबून हत्या केली आहे. त्यानंतर या निर्दयी बापाने स्वतःही आत्महत्येचा प्रयत्न केला. आरोपी गणेश विठ्ठल चौधरीने दारुच्या नशेच पत्नीला मारहाण केली होती. त्यामुळे त्याची पत्नी माहेरी निघून गेली होती. यातून गणेशने पोटच्या मुलाचा गळा दाबून खून केला. मुलाची हत्या केल्यानंतर गणेशने स्वतःच्या गळ्यावर चाकूने वार करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच मूल पोलीसांनी घटनास्थळी पोहचून पंचनामा केला. पोलिसांनी जखमी गणेश चौधरीला उपचारासाठी मूल उपजिल्हा रुग्णालयात पाठवले.

पुण्यात व्यावसायिकाची निर्घृ णहत्या बदनामी केल्याचा रागातून व्यावसायिकाची हत्या झाल्याचा प्रकार जुन्नर (Junnar) तालुक्यातील बेल्हे येथे घडला आहे. किशोर तांबे असं हत्या झालेल्या व्यावसायिकाचे नाव असल्याचे समोर आले आहेत. किशोर तांबे 5 एप्रिलपासून बेपत्ता होते. शनिवारी त्यांचा मृतदेह विहिरीत आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. बदनामी केल्याच्या रागातून पांडुरंग जिजाबा तांबे व महेश गोरकनाथ कसाळ यांनी किशोर यांची हत्या करुन मृतदेह विहिरीत टाकला होता.

## मुंबई महापालिका रूग्णालयांमध्ये मास्क अनिवार्य

महाराष्ट्रासह मुंबईत करोनाचे रूग्ण वाढत आहेत.

या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेने तयारी सुरू केली आहे. मुंबई महापालिकेच्या सर्व रूग्णालयांमध्ये मास्क अनिवार्य करण्यात आले आहेत. करोनाचा प्रसार वाढू नये म्हणून हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुंबई महापालिकेच्या रूग्णालयांमध्ये मास्क अनिवार्य करण्यात आल्याने आता या रूग्णालयांमध्ये काम करण्यात येणाऱ्या कर्म चाऱ्यांना मास्क लावणं अनिवार्य असणार आहे.



**मुंबईसह राज्यात वाढत आहेत करोना रूग्ण**


मुंबई मागील काही दिवसांपासून करोनाबाधितांची संख्या वाढू लागली आहे. कोरोनाच्या वाढत्या प्रभावानंतर मुंबई महापालिका प्रशासनाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. मुंबई महापालिकेने मास्क सक्ती करण्याच्यादृष्टीने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. मुंबई महापालिकेने आपल्या सर्व रुग्णालयात मास्क वापरण्यास सक्तीचे केले आहे. आज, महापालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी बैठक बोलावली होती. त्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

**काय काय सूचना केल्या आहेत इक्बाल सिंह चहल यांनी?**

औषधे किंवा वैद्यकीय खरेदी- महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्याने महानगरपालिकेची सर्व रुग्णालये मिळून आवश्यक असणारे ग्लोव्हज्, मास्क, पीपीई कीट्स त्याचप्रमाणे औषधसाठा व इतर वैद्यकीय सामुग्री यांचा आढावा घेवून त्यांची आवश्यकता असल्यास खरेदीची प्रक्रिया सुरु करावी, कोणत्याही बाबीचा तुटवडा भासणार नाही, याची खातरजमा करण्यात यावी. कोविड चाचण्या- कोविड संसर्ग बाधित रूग्ण वेळीच शोधून काढले तर संसर्गा ला अटकाव करता येतो, त्यामुळे कोविड चाचण्यांची संख्या वाढवावी, परिणामी उपचार करणे सोपे जाते. चाचण्यांची संख्या वाढवतानाच खासगी प्रयोगशाळा संचालकांची अतिरिक्त आयुक्त डॉ. संजीव कुमार यांनी लवकरात लवकर बैठक घ्यावी.

## संरक्षण विभागाच्या भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी केंद्र सरकारला साकडे !

मुंबई : केंद्र सरकारच्या अखत्यारितील एकूण भूखंडापैकी ६७३ एकर भूखंड झोपड्यांनी व्याप्त असून याबाबत जोपर्यंत केंद्र सरकारकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळत नाही तोपर्यंत या झोपड्यांचा पुनर्विकास होऊ शकत नाही. यापैकी काही भूखंडावरील झोपड्यांच्या बायोमेट्रिक सर्वेक्षणासाठी केंद्र सरकारने हिरवा कंदिल दाखविला असला तरी संरक्षण विभागाच्या भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत तसा प्रतिसाद मिळत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे याबाबत आता राज्य शासनाने नव्याने संरक्षण मंत्रालयाला पत्र लिहिले असून याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी विनंती केली आहे. सांताक्रूझ येथील गोळीबार रोड येथील ४२ एकर इतक्या संरक्षण विभागाच्या भूखंडावर असलेल्या झोपडपट्टीचा पुनर्विकास रखडला आहे. गेल्या



५० वर्षांपासून या झोपड्या अस्तित्त्वात आहेत. हवाईदलाच्या ताब्यात हा भूखंड आहे. या झोपडीवासीयांच्या बायोमेट्रीक सर्वेक्षणासाठी संरक्षण विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. मात्र पुढील कार्यवाहीसाठी आवश्यक असलेले ना हरकत प्रमाणपत्र दिले जात नसल्याची बाब २०१८ मध्ये राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती. त्यावेळी तत्कालीन संरक्षण मंत्री व मुख्यमंत्री यांच्यात बैठक झाली होती. देवेंद्र फडणवीस हे तेव्हा मुख्यमंत्री होते. झोपडपट्टीव्याप्त भूखंडापैकी ५० टक्के जागा अतिक्रमणमुक्त करून ती संरक्षण विभागाच्या ताब्यात देणे व उर्वरित ५० टक्के भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत चर्चा झाली होती. झोपड्यांचे सर्वेक्षण करून तसा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविण्यात यावा, असे या बैठकीत ठरले होते. त्यानंतर ऑगस्ट ते नोव्हेंबर २०१८ मध्ये या झोपड्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये नऊ हजार ४८३ झोपड्यांपैकी आठ हजार ७०६ झोपडीधारकांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले. मात्र त्यानंतर हा प्रकल्प ठप्प झाला. आता हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. यासाठी याआधीच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीची फेब्रुवारी २०२२ मध्ये बैठक पार पडली. संरक्षण विभागाच्या भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसनासाठी केंद्र सरकारने ना हरकत प्रमाणपत्र देणे किंवा पंतप्रधान आवास योजनेनुसार पुनर्विकास शक्य असल्यामुळे या दोन्ही मुद्द्यांबाबत केंद्र शासनाला कळविण्यात आले आहे, असेही याबाबत एका अधिकाऱ्याने सांगितले. देवेंद्र फडणवीस यांनी नेमकं काय म्हटलं आहे? केंद्र शासनाच्या मालकीच्या भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाला भूखंडाचा मोबदला देणे किंवा पर्यायी भूखंड उपलब्ध करून देणे या दोन्ही मुद्द्यांचा पुनर्विचार व्हावा अशी राज्य शासनाची भूमिका असून त्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे - देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्रीकेंद्र सरकारच्या मालकीच्या भूखंडावरील झोपडपट्टीव्याप्त परिसर (एकरमध्ये) : विमानतळ प्राधिकरण -२७६, जुहू विमानतळ - ३८, भूदल - २८.०८, हवाईदल, सांताक्रूझ - ४२, नौदल कुलाबा - ७.७१, रेल्वे (पश्चिम व मध्य) - ९६.३६, मुंबई पोर्ट ट्रस्ट - ३०.८३, खाजण भूखंड - ३६.३६, भाभा अणु संशोधन केंद्र - १९.८३, आयआयटी मुंबई - १०.९, आयुर्विमा महामंडळ, राष्ट्रीय रायनिक खत, महानगर टेलिफोन निगम, भारत पेट्रोलिअम, सीमाशुल्क विभाग, नॅशनल सिक्युरिटी गार्ड, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, टपाल आणि तार खाते आदी - ७६.३१

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898